ISSN 2456-656X

# महाराष्ट्र साहित्य पत्रिका

जुलै ते सप्टेंबर २०२२

## समीक्षक वसंत दिगंबर कुलकर्णी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त विनम्र अभिवादन






## संस्थात्मक कामासाठी कार्यनिष्ठा आणि ज्ञाननिष्ठा महत्त्वाची : डॉ. राजा दीक्षित

'संस्थात्मक कामासाठी कार्यनिष्ठा आणि ज्ञाननिष्ठा महत्त्वाची असते. डॉ गं.ना. जोगळेकर यांच्याकडे ती होती म्हणून त्यांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेसाठी केलेल्या कामाचा ठसा उमटला, 'असे मत महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ.राजा दीक्षित यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने डॉ. गं. ना. जोगळेकर स्मृती पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार आणि लेखक अरविंद गोखले यांना डॉ. दीक्षित यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला, त्या वेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी होते. कोषाध्यक्ष सुनिताराजे पवार, कार्यवाह बंडा जोशी, पराग आणि उज्ज्वला जोगळेकर या वेळी उपस्थित होते. रोख रक्कम, सन्मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते.

गोखले म्हणाले, 'पत्रकारितेच्या क्षेत्रात काम करताना समाजजीवन खूप जवळून पाहायला मिळाले. जयंतराव टिळक, चंद्रकांत घोरपडे अशा संपादकांच्या समवेत काम करताना खूप शिकायला मिळाले. केलेला अभ्यास आणि संशोधन पुस्तकं लिहिण्यासाठी उपयुक्त ठरले. हा पुरस्कार आजवर केलेल्या कामाची पावती आहे.' अध्यक्षीय समारोप करताना प्रा. जोशी म्हणाले, 'अरविंद गोखले यांनी व्यासंगी आणि तत्त्वनिष्ठ संपादक आणि अभ्यासू लेखक म्हणून आपला ठसा उमटविला आहे. केवळ वैयक्तिक स्वार्थासाठी काम करणाऱ्या व्यक्ती संस्थेतील पदावरून गेल्या की, त्या संस्थेच्याही स्मरणात राहत नाहीत आणि समाजही त्यांना लक्षात ठेवत नाही. डॉ. जोगळेकर सर्वांच्या स्मरणात आहेत कारण त्यांनी संस्थेच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य दिले.'

सुनिताराजे पवार यांनी आभार मानले. बंडा जोशी यांनी सूत्रसंचालन केले.

येणें वाग्यज्ञे तोषावें

महाराष्ट्र
साहित्य
परिषद

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे त्रैमासिक मुखपत्र

# महाराष्ट्र साहित्य पत्रिका

अंक क्र. ३७९, जुलै ते सप्टेंबर २०२२

संपादक । **डॉ. पुरुषोत्तम काळे**

प्रकाशक । **प्रकाशक पायगुडे** प्रमुख कार्यवाह

**महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे**
४९६ सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणे ४११०३०.
दूरभाष । ०२०–२४४७५९६३
संकेतस्थळ । www.masapapune.org
ई–मेल । masaparishad@gmail.com

कार्यालयाची वेळ ।
सकाळी ९.०० दुपारी १२.००
दुपारी ४.३० ते रात्री ८.००

# मसाप पत्रिका
# एप्रिल ते जुलै २०२२
# अंक ३७९

संपादक
**डॉ. पुरुषोत्तम काळे**

मुद्रक–प्रकाशक
**प्रकाश पायगुडे**
प्रमुख कार्यवाह
महाराष्ट्र साहित्य परिषद,
टिळक रस्ता, पुणे ४११०३०

संपादकीय संयोजन
**संदीप खाडे**

अक्षरजुळणी व सजावट
**लक कलाकल्य**

मुखपृष्ठ
**जयदीप कडू**

मुद्रितशोधन
**आरती देवगांवकर**

मुद्रणस्थळ
**एस. ए. प्रिंटर्स,**
फ्लॅट नं. ५, ३ रा मजला,
सिद्धीविनायक अपा.,
शिवदर्शन, पुणे ४११००९

मूल्य : **१५ रुपये**


या अंकात व्यक्त झालेल्या विचारांशी संपादक, संपादन समिती, सल्लागार मंडळ तसेच प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

# अंतरंग


१) ९६ व्या अ. भा. म. सा. संमेलनाध्यक्षपदी न्या. नरेंद्र चपळगावकर यांची निवड :
विवेकी ज्ञानतपस्व्याचा सन्मान.। **डॉ. पुरुषोत्तम काळे** । ७

२) साहित्य क्षेत्रातील अक्षय चांदणे डॉ. व. दि. कुलकर्णी । **डॉ. मेधा सिधये** । ९

३) आधुनिक काळातील साने गुरुजी । **सुरेश देशपांडे** । १४

४) प्राचीन मराठी ग्रंथातील विनोदाचे स्वरूप । **प्रा. डॉ. वर्षा तोडमल** । १७

५) राजारामशास्त्री भागवत यांचा स्त्रीविचार । **डॉ. मनीषा खैरे** । २१

६) नाटकांचे पुनरुज्जीवन आवश्यक आहे का? । **मिलिंद शिंदे** । २९

७) मराठी प्रायोगिक नाटकांचे स्वरूप आणि विचार । **प्रा. डॉ. संजय लांडगे** । ३२

८) राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि कोल्हापुरातील मुस्लीम समाज । **श्री. संदीप वसंतराव जाधव** । ३७

९) लिंगभाव संकल्पना आणि स्वरूप । **निकिता अनिल शेंडगे** । ४२

१०) 'आलोक'चे भाषिक सामर्थ्य । **डॉ. सुधीर बब्रुवान मोरे** । ४६

११) फ्रेंच लेखक रोलां बार्थ मराठीत समजून घेताना...। **डॉ. मिलिंद कसबे** । ४९

१२) विज्ञानकथा : स्वरूप आणि संकल्पना । **ज्योत्स्ना शिवाजी खंडागळे** । ५६

१३) नुसातं : शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक संघर्षाची अनाथ जीवनगाथा । **संदेश ढोले** । ६०

१४) ग्रामीण समस्यांशी समरस होणारा कथासंग्रह : अवकाळी विळखा । **डॉ. राजेंद्र थोरात** । ६७

१५) 'नाही गिरवता येत कुठलीच लिपी' जगण्याच्या सर्व शक्यता आजमावणारी कविता' । **दा.गो. काळे** । ७१

१६) कविवर्य शंकर रामाणी यांच्या कवितेचा समग्र आणि चिकित्सक आढावा । **प्रा. विनायक ल. बापट** । ७४

१७) 'तळमळीचा तळ' अजीम नवाज राही ह्यांचा शब्दाविष्कार । **किरण शिवहर डोंगरदिवे** । ७८

१८) अंतरीच्या अस्वस्थ कल्लोळाची कविता : । **प्रा. डॉ. अरुण कोळेकर** । ८४

१९) 'समतेचा ध्वज' उंचावणारी कविता । **डॉ. नवनाथ तुपे** । ९२

२०) कादंबरीला नवा आयाम प्राप्त करून देणारी
कादंबरी म्हणजे शेवटची लाओग्राफिया ही कादंबरी । **प्रा. डॉ. संजय नगरकर** । ९७

२१) ब्र कादंबरीतील सांस्कृतिक लिंगभावात्मक राजकारण । **डॉ. गजानन विठ्ठलराव भोसले** । १०१

२२) कादंबरी चिकित्सा एकेक पान गळावया–गौरी देशपांडे । **शिल्पा संजय कुंभार** । १०९

२३) नव्या आयामांची मांडणी करणारी कादंबरी : वंदे मातरम् । **प्रा. विजयकुमार खंदारे । ११३**

२४) भुरा; बुद्धिजीवी प्रवाशाची आत्मकथा । **डॉ. नाना झगडे । ११७**

२५) वास्तवाचे भान देणारी : 'थिजलेल्या काळाचे अवशेष' । **डॉ. प्रकाश शेवाळे । १२१**

२६) आ.ह. साळुंखे यांचे 'तुकारामाचा शेतकरी' विषयक चिंतन । **शुभम गजानन बुटले । १२९**

२७) गोफणबाज कविता : 'आठ फोडा आन बाहेर फेका' । **अरुण चव्हाळ । १३३**

२८) लोकशाहीर पुंडलिक फरांदे : लोकरंजनातून लोकशिक्षण देणारा लोकशिक्षक ।
**प्रा. डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात । १३७**

२९) 'युद्धरत : युद्धाकडून बुद्धाकडे जाणारी कालातीत कविता' । **सविता कुरुंदवाडे ।१४१**

३०) सातपुड्यातील आदिवासी तडवीची लग्नगीते । **मुकेश एकनाथ सावळे । १४६**

३१) विवेकाचे वारसदार : डॉ. नरेंद्र दाभोलकर । **भिकचंद सखाहरी लांडे । १५०**

३२) वसंत नरहर फेणे यांच्या 'आकाशपुष्प' या कथेचे मानसशास्त्रीय आकलन ।
**सीमा अशोक कदम । १५४**

३३) सकारात्मक ऊर्जेचा आविष्कार : 'मोशनल मोटिव्हेशनल आणि इमोशनल' ।
**प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे । १५९**

३४) अक्षय प्रेमाचे मागणे मागणारी कविता ...। **वर्षा मारुती भिसे । १६२**

३५) व्यवस्थेची चिरफाड करणाऱ्या : 'शिक्षणाच्या कविता' । **डॉ. सुरेश सावंत । १६५**

३६) मराठी साहित्यातील वडार समाज : सांस्कृतिक दर्शन । **अनिल सतिश गोटे । १६९**

३७) मराठी विज्ञानकादंबरी : स्वरूप आणि वाटचाल । **डॉ. रवींद्र शिंदे । १७३**


३८) शाखा कार्यवृत्त । **१७८**

# कविवर्य शंकर रामाणी यांच्या कवितेचा समग्र आणि चिकित्सक आढावा

**प्रा. विनायक ल. बापट**

कविवर्य शंकर रामाणी यांचे हे जन्मशताब्दी वर्ष! शंकर रामाणी हे गोमंतकीय काव्य क्षितिजावर तळपणारे एक महत्त्वाचे नाव. तळपणारे असले तरी एका विशिष्ट वर्तुळाबाहेर त्यांची कविता जाऊ शकली नाही त्यामुळे काहीसे दुर्लक्षित राहिलेले असेही म्हटल्यास वावगे ठरणार नाही. अशा या कविच्या कवितांचा समग्रपणे, चिकित्सकपणे आढावा घेणारे पुस्तक कविवर्य शंकर रामाणी यांच्या जन्मशताब्दी वर्षात प्रसिद्ध व्हावे हे निश्चितच कौतुकास्पद आहे. 'रामाणी: शंकर रामाणी यांची समग्र मराठी कविता-संपादन: अनुजा जोशी' हे पुस्तक रामाणींच्या काव्य प्रतिभेचे विविध विशेष चिकित्सकपणे मांडताना त्यांच्या काव्याचे नव्याने आकलन करताना दिसते. या पुस्तकाच्या संपादनासाठी डॉ. अनुजा जोशी यांनी घेतलेली मेहनत, त्यांची चिकाटी, त्यांचे काव्यविषयक ज्ञान, रामाणींच्या काव्याशी त्यांचा जुळलेला आंतरिक सूर, त्यांच्याकडे असलेली काव्याच्या रसग्रहणाची मर्मग्राही दृष्टी या सर्वांचे दर्शन या पुस्तकातून झाले आहे. एका अर्थाने दुर्लक्षिततेचा जो शाप अंधारी वाटेवरून प्रकाशाचे 'पालाण' शोधणाऱ्या या कवीला लाभला होता त्या कवीच्या जन्मशताब्दी वर्षात हे पुस्तक म्हणजे त्याच्या दुर्लक्षित काव्यप्रतिभेला मिळालेला हा उःशाप आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

या पुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे रामाणींची समग्र मराठी कविता या पुस्तकात एकत्रितपणे समाविष्ट झाली असून त्यामुळे अभ्यासकांची खूप मोठी सोय झाली आहे कारण रामाणींचे अनेक काव्यसंग्रह मिळणे आज दुर्लभ झाले आहे. हे पुस्तक गोवा मराठी अकादमीने प्रकाशित केले




पुस्तकाचे नाव : **रामाणी**
लेखकाचे नाव : **अनुजा जोशी**
प्रकाशक - **गोवा मराठी अकादमी**
किंमत -६०० /- रु

असून पुस्तकाच्या वितरणाची जबाबदारी मॅजेस्टिक सारख्या प्रथितयश प्रकाशनाने घेतली आहे त्यामुळे हे पुस्तक समस्त रसिक वाचक, समीक्षक आणि अभ्यासक यांच्यापर्यंत पोहोचेल याचा विश्वास वाटतो. एका अर्थाने रामाणी त्यांच्या काळात काहीसे दुर्लक्षित राहिले तरी त्यांच्या जन्मशताब्दी वर्षात त्यांच्या जन्मभूमीने त्यांचे ऋण फेडण्याचा हा केलेला छोटासा प्रयत्न असे म्हटले पाहिजे व यासाठी डॉ. अनुजा जोशी व गोवा मराठी अकादमी निश्चितच अभिनंदनास पात्र आहेत.

रामाणींच्या समग्र काव्याचा चिकित्सक आढावा घेऊन त्यांच्या कवितेची वैशिष्ट्ये, त्यातील सौंदर्य स्थळे, त्यातील प्रतिमा सृष्टी, निसर्ग वर्णन, प्रेम वर्णन, प्रतिमा प्रतीकांचा वापर, त्यात आलेली मिथके, त्यांच्या कवितेचे भाषिक वेगळेपण, त्यांच्या कवितेची शैली या सर्वांवर अत्यंत मुद्देसूद असे विवेचन आपल्या जवळ जवळ ऐंशी पानी विस्तृत प्रस्तावनेत डॉ. अनुजा जोशी यांनी केले आहे. ज्या चिकित्सकपणे प्रा. एस.एस. नाडकर्णी यांनी बोरकरांच्या कवितेचा आढावा आपल्या 'बोरकर-काव्यसमीक्षा (१९३७ ते २००८) या पुस्तकात घेतला आहे तसाच हा डॉ. अनुजा जोशी यांनी घेतलेला शंकर रामाणी यांच्या समग्र कवितेचा आढावा आहे. हा आढावा घेताना त्यांनी शंकर रामाणी यांच्या कवितेबद्दलची निश्चित अशी मते नोंदवताना शंकर रामाणी यांचे गोमंतकीय मराठी कवितेतील व एकूण मराठी कवितेतील त्यांचे स्थान निश्चित करण्याचा केलेला हा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे.

बोरकरांचा वारसा रामाणींनी समर्थपणे चालवला हे सांगताना 'बोरकरांची कविता निखळ आनंदमार्गी व रामाणींची कविता गूढ व्यथामार्गी असा मुळातील फरक असला तरी दोहोंची अंतःप्रेरणा व आशयसूत्रे सकारात्मक जीवननिष्ठेची आहेत.' हे त्यांचे निरीक्षण अत्यंत अभ्यासनीय आहे.'आजच्या नव्या काळातही जाणिवापोषक मूलद्रव्य असणारे तिचे प्रातिनिधिक मूल्य अबाधित असल्यामुळे या कवितेची नव्याने चर्चा होणे आवश्यक आहे.' हे त्यांचे मतही तेवढेच महत्त्वाचे आहे. रामाणींच्या काव्याचा सखोलतेने शोध घेण्यासाठी त्यांच्या चरित्राचा घेतलेला आधार खूप महत्त्वाचा असून त्यामुळे त्यांच्या काव्यावरील गूढतेचे धुके दूर होण्यास खूपच मदत



झाली आहे. काळाच्या ओघात मराठी कवितेत परिवर्तनाची अनेक आवर्तने आली तरी रामाणींची कविता अविचल राहिली, हे त्यांच्या कवितेचे वैशिष्ट्य असले तरी ती त्यांच्या कवितेची मर्यादा देखील कशी ठरली आहे याचे अभ्यासपूर्ण विश्लेषण या पुस्तकात आले आहे. या पुस्तकाच्या अनुषंगाने, 'इतिहास, संस्कृती, भाषा, साहित्य, कला अशा सर्वच क्षेत्रांत गोव्याची परंपरा प्राचीन काळापासून मराठी आणि मराठीच राहिली आहे.' हे डॉ. अनुजा जोशी यांचे विधान गोव्याची समृद्ध मराठी परंपरा अधोरेखित करणारे आहे.

तांबे, बालकवी, अनिल, पु. शि. रेगे, बा. भ. बोरकर ते पाडगावकर, बापट, करंदीकर, इंदिरा संत, ग्रेस यांनी लिहिलेल्या भावकवितांच्या जातकुळीतीलच कविता शंकर रामाणी यांनी लिहिली, हे सांगतानाच रामाणींच्या कवितेतील 'ओल्या अबोधाचा वाळा' कसा समृद्ध होत गेला, हे त्यांच्या प्रत्येक टप्प्यावरील कवितेत झालेला बदल नोंदवत अनुजा जोशी यांनी सप्रमाण दाखवून दिले आहे. महत्त्वाचे म्हणजे रामाणींच्या कवितेचा आढावा घेताना पु.शि. रेगे, म.सु. पाटील, डॉ. प्रल्हाद वडेर ते रमा मराठे अशा विविध अभ्यासकांनी जो रामाणींच्या काव्याचा आढावा घेतला आहे त्याचेही संदर्भ त्यांनी

घेतले आहेत आणि म्हणूनच त्यांच्या विवेचनाला अधिक सखोलता प्राप्त झाली आहे. रामाणींच्या काही कविता आत्मकथनपर कशा आहेत याची त्यांनी केलेली मांडणी निश्चितच मुळापासून पाहण्यासारखी आहे. रामाणींच्या कवितेत येणारे जे काही वैशिष्ट्यपूर्ण शब्द आहेत त्याचा घेतलेला वेध हे लेखन करताना डॉ. जोशी या कवितेशी किती एकरूप झाल्या होत्या याची साक्ष देतात. या संबंधात रामाणींच्या कवितेत आलेला 'अलक्ष' या शब्दाचा आढावा पाहण्यासारखा आहे. ज्ञानेश्वरीपासूनचा या शब्दाचा प्रवास त्यांनी सांगितला आहे. रामाणींच्या कवितेतील संत साहित्याच्या प्रभावाची चर्चाही सखोलपणे केली आहे.

नित्य वापरातील शब्द किंवा प्रतिमा रामाणींच्या कवितेत किती वेगळ्या प्रकारे येतात याची चर्चा

**'मला आकाश आंदण कुठे अज्ञाताची वेस**
**झाड वाजे मनात, वेच शब्दांचा पाऊस'**

अशी उदाहरणे घेऊन केला आहे. यातील झाडाची प्रतिमा किंवा अनेक कवितांतून येणारी 'मोराची' प्रतिमा याचे सुंदर विवेचन या पुस्तकात आले आहे. एकूणच त्यांच्या कवितेतील प्रतिमा विश्व किती नजाकतभरे असते याचा वेध अनेक कवितांचे संदर्भ घेऊन घेतला आहे. रंगाला जशा वेगवेगळ्या छटा असतात तशा एकाच प्रतिमेलाही वेगवेगळ्या छटा असतात आणि एकच प्रतिमा वेगवेगळ्या छटा घेऊन रामाणींच्या कवितेतून कशी येते याचा घेतलेला वेध मनोवेधकच म्हटला पाहिजे. रामाणींच्या कवितेतील शब्दसंवेद्य प्रतिमा उदा: संभ्रमांची झांझ, हृदयाची सारंगी इ.

स्पर्शसंवेद्य प्रतिमा उदा: आषाढ स्पर्शाची वीज, त्वचेचा उंबरा इ. रूपसंवेद्य प्रतिमा उदा: हळूहळू सांज बुडे लालबुंद रुसव्यात, मनाचा हिरवा पक्षी, नीलकंठ समुद्र इ. रससंवेद्य प्रतिमा उदा: शिजलेल्या अंधारातून, धगधगत्या भट्टीत भाजलेल्या ब्रेडसारखे उन्हाळी आभाळ इ.

गंधसंवेद्य प्रतिमा उदा: यात फुले, फळे, माती, वस्तू यांचे विशिष्ट गंध, भाव व्यक्त होतातच; पण जैविक सगुण गंधाच्या पलीकडे गेलेल्या अभौतिक, अलौकिक अशा गंध संवेदना कवितेत कशा प्रकटतात याचाही वेध डॉ. अनुजा जोशी यांनी घेतला आहे. उदा: ओला आकाशाचा वास, जुईची भोवळ, त्वचेच्या रानात गंध दारे इ.

रामाणींच्या प्रतिमा सृष्टीची अधिक सखोल चर्चा करताना रामाणींच्या काव्यातील पंचेंद्रिय संवेदना सुटेपणाने जेवढ्या तरलपणे व्यक्त झाल्या आहेत तेवढीच त्यांची सरमिसळ होऊन तयार होणारी प्रतिमासृष्टी विलोभनीय आहे हे निरीक्षण नोंदविताना रामाणींनी स्पर्शाला रूप दिले आहे, गंधाला सूर दिला आहे, रूपाला शब्द दिला आहे हे सांगताना त्याची अगदी नेमकी अशी उदाहरणे देखील दिली आहेत. हा रामाणींच्या कवितेतील प्रतिमा सृष्टीचा आढावा वाचल्यानंतर डॉ. अनुजा जोशी रामाणींच्या कवितेशी किती एकरूप झाल्या आहेत याची साक्षच पटते.

गोमंतकीय कवीची कविता म्हटली की प्रादेशिकतेची चर्चा अपरिहार्यपणे येतेच ती या पुस्तकातही आली आहे व 'भूमिनिष्ठतेचे व प्रादेशिकतेचे विशेष दर्शन हा रामाणींच्या कवितेला समृद्ध करणारा काव्यगुण आहे,' सांगताना येथील निसर्ग, लोकजीवन, संस्कृती, स्थानिक बोली यांचे पडसाद अकृत्रिमरीत्या त्यांच्या कवितेत कसे उतरले आहेत हे त्यांनी त्यांच्या कवितांची अनेक उदाहरणे देत स्पष्ट केले आहे. गोव्याच्या मातीत फुलणारी, वाढणारी अनेक वृक्ष, झाडे, फुलझाडे, या मातीत येणारी विविध पिके, येथील ऋतुचक्राचे विशेष याचे संदर्भ रामाणींच्या कवितेत कसे विखुरले आहेत हे सांगताना त्यांच्या कवितेचे प्रादेशिकत्व अनुजा जोशी यांनी नेमकेपणाने उदाहरणांसह अधोरेखित केले आहे. रामाणींच्या कवितेत येणाऱ्या निसर्गाची चर्चा लक्षात घ्यावी लागते कारण समकालीन असल्याने या बाबतीत रामाणींची तुलना बोरकरांशी होणे अपरिहार्य आहे. या संदर्भात रामाणींच्या कवितेतील निसर्ग वेगळा कसा हे सांगताना, 'रामाणी यांचे कविमन निसर्ग नावाच्या सुहृदाशी संवाद करते.' व्यथामय जगण्याच्या वाटेवरचा सहचर सोबती म्हणून निसर्ग त्यांना साथ करतो.' हे त्यांचे निरीक्षण महत्त्वाचे. हे वर्णन बोरकर व रामाणी यांच्या कवितेतील पृथगात्मकता सांगण्यासाठी पुरेसे आहे.

रामाणींची कविता ओळखली जाते ती तिच्यातील समृद्ध आध्यात्मिक जाणिवांसाठी. डॉ. अनुजा जोशी यांनी रामाणींच्या कवितेतील आध्यात्मिक जाणिवांचा शोध अगदी सखोलतेने पण तेवढ्याच तरलतेने घेतला आहे. जीवनविषयक साधकबाधक विचार, उत्कट

आत्मानुभूती, सखोल जीवन चिंतन व या सर्वांतून गवसलेले सारचिंतन म्हणजे रामाणींची अध्यात्मदर्शी कविता हे सांगतानाच हे ही सर्व मांडणी किती तरल पातळीवर झाली आहे हे

**'माझी पांगुळ पुण्याई; चार भिंतीचे घर्कुल**
**आत मांडीयेली चूल आयुष्याची'**

अशी समर्पक उदाहरणे घेऊन दाखवले आहे. आयुष्यातील विविध टप्प्यांवर रामाणींच्या आध्यात्मिक जाणिवा कशा समृद्ध आणि संपन्न होत गेल्या याचाही कालदृष्ट्या घेतलेला वेध या अभ्यासाची खोली अधिक वाढवणारा आहे. 'त्यांची कविता म्हणजे व्यथा वेदनांचा, दैवदाटल्या तिमिराचा उत्सव आहे.' असे सांगताना, 'तमाच्या तळीचे दीप' या कल्पनेमध्ये हेच सूत्र आहे हे त्यांनी सांगितले आहे. सुख व दुःख तितक्याच तरलतेने व सश्रद्धपणे भोगणारी संत वृत्ती रामाणींच्या कवितेत दिसते असे त्यांनी म्हटले आहे.

**बुडू यावे खोल ऐशी तळमळ**
**अथांगाचा तळ अंतरात**
**बुजलेली तमी डोळ्यांची कवाडे**
**कोसळले रडे प्रकाशाचे**

अथांग वेदना भोगूनही प्रकाशाचे रडे रडणारा हा कवी सर्व बंधनाच्या पलीकडे कसा गेला होता याचा खूप सखोल आढावा या पुस्तकातून दिसतो.

आध्यात्मिकतेचा शोध घेतानाच रामाणींच्या कवितेतील मिथकता किंवा मिथकांचा वापर याचाही घेतलेला शोध रामाणींच्या कवितेबद्दल आपणाला नवीन दृष्टी देणारा आहे.

रामाणींच्या काव्यातील समग्रतेला स्पर्श करताना त्यांची बालकविता, संगीतिका आणि त्यांची कोंकणी कविता याचाही अभ्यासपूर्ण आढावा या पुस्तकात घेण्यात आला आहे.

'आज सोशल मीडियाच्या व जाहिरातबाजीच्या उद्रेकामध्ये व मीडियाने जोरकसपणे प्रभावित करणाऱ्या या चमचमत्या काळात स्वतःची काव्यभाषा व शैली घडवणे व ती जपण्याचे भान येणे हे साहित्यिक मूल्य समजून घ्यायचे तर त्याचा वस्तुपाठ रामाणींची कविता देऊ शकते.' हे निरीक्षण एकूणच रामाणींची अविचल काव्यनिष्ठा अधोरेखित करण्यास पुरेसे आहे. या पुस्तकाचा मला सर्वांत जास्त जाणवलेला विशेष म्हणजे रामाणींच्या कवितेतील सामर्थ्याचा, सौंदर्यस्थळांचा, तिच्यातील नजाकततेचा, तिच्यातील सखोल जाणिवांचा, आशयगर्भतेचा शोध घेतानाच तिच्या मर्यादा कोणत्या हे ही अनुजा जोशी यांनी सांगितले आहे. प्रतिमांची पुनरावृत्ती, एकाच अर्थाची पुन्हा पुन्हा होणारी आवर्तने, गूढतेला अनेककडे प्राप्त होणारी दुर्बोधता, काहीकडे अती सूक्ष्मतेमुळे बोजड होणारी आध्यात्मिकता तसेच अगदी टिपेला पोहोचताना अनेक कवितांचे होणारे सपाटीकरण या सर्व मर्यादांची चर्चा देखील त्यांनी निःसंकोचपणे केली आहे.

रामाणींची कविता काहीशी दुर्लक्षित राहण्यास वर नोंदवलेली कारणे कारणीभूत आहेत हे सांगतानाच सखोल चिंतनशील कवितेला तेवढाच चिंतनशील वाचक मिळणे क्रमपात्र असते अन्यथा फक्त मंचीय कवींनाच प्रसिद्धी लाभणे आणि चिंतनशील कवींना अज्ञातवास लाभणे क्रमपात्र आहे हे त्यांच्या निरीक्षणाचे सार आपल्या एकूण साहित्यिक व्यवहाराला अस्वस्थ करणारे आहे. हा प्रगल्भ वाचक घडविण्यास आज तरी आपली वाचन संस्कृती सक्षम झाली आहे का? हा प्रश्न सहज मनात उभा राहतो आणि चिंतेचे सावट निश्चितच आपल्या चेहऱ्यावर उमटते.

एकूणच शंकर रामाणींच्या कवितेला जी उपेक्षितता लाभली होती ती त्यांच्या जन्मशताब्दी वर्षात या पुस्तकाच्या रूपाने निश्चितच काही अंशी कमी झाली आहे. एकूणच मराठी कविता, विशेषतः गोमंतकीय काव्याची परंपरा आणि शंकर रामाणी यांच्या काव्याचा अभ्यास ज्याला करायचा असेल त्याला या पुस्तकाचा आधार घेतल्याशिवाय पुढे जाता येणार नाही एवढे निश्चित.

**प्रा. विनायक ल. बापट**
मराठी अध्ययन शाखा शणै गोंयबाब भाषा आणि
साहित्य महाशाळा, गोवा विद्यापीठ.

■■■